# 'एसजीजीएस' मध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त धान्यकीटचे वाटप





नांदेड,दि.१७:-शहरातील विष्णुपुरी येथील गुरुगोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतिने स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयातील साफसफाई कामगार, सुरक्षा रक्षक तसेच गरजूवंत कामगारांना धान्याचे किट वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम कॉलेजचे डायरेक्टर डॉ. यशवंत जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी कॉलेजमधील डॉ. आर.एस.होळंबे, डॉ. अरूणकुमार पाटील, दमकोंडवार सर, गजानन मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम डॉ. अविनाश वांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कॉलेजमधील स्कल्प टीमने वर्गनी जमा करून या कार्यक्रमासाठी धान्य कीट उलब्ध करून दिल्या. या टिममध्ये अंगद सिंघ सेना, प्रशांत गोवंदे, राजप्रीत सिंघ जागिरदार,मनीष ठकूरवार, प्रशांत दुधमल आदिंचा समावेश आहे. कोरोना काळात अनेक गोरगरिबांना मदत व्हावी, या हेतूने हा कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेवून आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. हा उपक्रम अन्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राबविला तर अनेक गोरगरिब मजूर कामगारांना त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यक्त केल्या गेली.

खुली असून यात हौशी

पारितोषिक रु. ११,०००/- आणि तृतीय पारितोषिक रु. ७०००/- देण्यात येईल. याशिवाय

शिंदे, डॉ.पी. विठ्ठल, डॉ. अशोक कदम यांनी केले आहे.